महाराष्ट्र शासन

परिचर्या महाविद्यालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर.

# College of Nursing Govt. Medical college, Nagpur

Email congmcnag@rediffamail.com
Fax no-07122701614

जावक क्र.शावैम./परिमहा/प्रवेश प्रक्रिया-२१-२२/ जाहीरात/ 101 /२२ दि.25/ ०१/२०२२

## जाहीरात

सक्षम अधिकारी तथा सहसंचालक,संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुबंई यांच्या मार्फत परिचर्या महाविद्यालय,शा.वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे एम.एस्सी.नर्सिंग (२वर्ष) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २५ जागांकरिता (१०-डीएमईआर,१०-डी.एच.एस, ०५- खाजगी) सन २०२१-२२ करिता अर्हना प्राप्त उमेदवारांकडून प्रवेश अर्ज मागण्यात येते आहे.

| | |
|---|---|
| महिती पुस्तीका व प्रवेश अर्ज विक्री दिनांक व ठिकाण | दि.०१/०२/२०२२ ते ०५/०२/२०२२ परिचर्या महाविद्यालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर |
| प्रवेश अर्ज स्वीकृतीचा अंतिम दिनांक | दि.०८/०२/२२ संध्या ५:०० वाजे पर्यत |
| माहिती पुस्तीका व प्रवेश अर्ज विक्री शुल्क | खुल्या प्रर्वगातील उमेदवारांकरिता रक्कम रु. २०००/- (रु दोन हजार फक्त) व राखीव प्रर्वगातील उमेदवारांकरिता रक्कम रु. १५००/- ( रु.एक हजार पाचशे फक्त) इतके असेल. |

**१. पात्रता व अर्हताः-**

१.१) फक्त भारतीय नागरिकत्व असलेले उमेदवारचं प्रवेशास पात्र असतील (राष्ट्रीयत्वाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१.२)३० नोव्हेबंर २०२१ या दिनांकास खुल्या गटातील उमेदवारांसाठी ४५ वर्षे व मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी ५० वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील.

**२. अर्हता परिक्षा व कार्यानुभवः-**

२.१) उमेदवारांने महाराष्ट्र राज्य माध्यामिक परिक्षा मंडळाची उच्चमाध्यमिक प्रमाणपत्रपरिक्षा किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यता प्राप्त तत्सम परिक्षा इंग्रजी विषयांसह उत्तीर्ण केलेली असावी.

२.२)ज्या उमेदवारांचे पालक महाराष्ट्र राज्यातील मुळ रहवासी असतील परंतू उमेदवार माध्यमीक शालांत वा तत्सम आणि/किंवा उच्च माध्यमीक शालांत परिक्षा महाराष्ट्र राज्या बाहेरील संस्थेतून उत्तीर्ण झाला असेल तर असाही उमेदवार प्रवेशासाठी पात्र असेल. मात्र अशा उमेदारांनी जिल्हादंडाधिकारी अथवा महानगर दंडाधिका-याच्या सहीचे मूळ वास्तव्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.३) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहवासी असावा. तसेच त्याने भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषद यांच्या मान्यता प्राप्त संस्थेतून/अभ्यासकेंद्रातून बेसिक बी.एस्सी. नर्सिंग/पी.बी बी. एस्सी (इग्नू) नर्सिग अभ्यासक्रमाची परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२.४)उमेदवार हा नर्स आणि मिडवाईफ म्हणून महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे तसेच सदर नोंदणीचे २०२२ पर्यंतचे नुतनीकरण केलेले असावे.

२.५)उमेदवारांने नर्स आणि मिडवाईफ म्हणून महाराष्ट्र परिचर्या परिषदकडे नोंदणी केल्यानंतर एका वर्षाचा कार्यानुभव असणे अनिवार्य आहे.

२.६) शासनसेवेतील उमेदवारांनी पाच वर्षे शासनसेवा अखंडीत पुर्ण केलेली असली पाहिजें. उमेदवाराने या कार्यानुभव संबधीचे प्राधिका-याचें प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.७) सेवांतर्गत उमेदवारांनी त्यांचे अर्ज योग्य यंत्रणे मार्फत सादर करावेत.योग्य यंत्रणे मार्फत विहीत वेळेत प्राप्त झलेल्या अर्जानुसार गुणवत्ता यादी तयार केली जाईल.उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.तसेच उशिराने पोस्टाव्दारे आलेल्या झेरॉक्स किंवा अर्जाच्या प्रती स्विकारल्या जाणार नाहीत.याची नोंद घेण्यात यावी

- संविधानिक आरक्षण नियमानुसार लागू राहील.
- शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र शासन निर्णय दि.०१/०३/२०११ च्या नुसार आकारण्यात येईल.
- आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात केंद्रशासन/राज्यशासन/केंद्रीय परिषद/मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी वेळो वेळी दिलेले आदेश लागू राहतील
- माहिती पुस्तीका व प्रवेश अर्जाच्या शुल्काचा (ना परतावा) धनाकर्ष (डी.डी) ' Dean, Government Medical College, Nagpur यांच्या नावे स्वीकारण्यात येईल.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर.